# शाळापूर्व तयारी अभियानाचा बालकांच्या विकासावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास

**श्रीमती प्रेरणा भगवानराव मोरे**
अधिव्याख्याता
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जालना.

**१. प्रस्तावना :-**

बालकांच्या विविध क्षमताचा विकास होण्यासाठी शासन स्तरावर विविध योजना राबविल्या जात आहेत. शिक्षणाच्या माध्यमातून तर्क, विचार, कल्पना, भावना, बुध्दी या मानसिक कक्षाचा विकास होतो. शिक्षणातूनच जीवनरूपी ध्येय आपण ठरवत असतो. म्हणजेच जीवनरूपी ध्येय साध्य करण्यासाठी व्यक्तीमत्वाचा समाकलीत विकास करण्यासाठी शिजज हे अत्यावश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीचा सर्वांग विकासासाठी शिक्षण हे एक हुकमी हत्यार आहे. कोणत्याही क्षेत्राचा विकास करायचा असेल तर त्या क्षेत्राच्या मुलभूत घटकांचा विकास होणे गरजेचे आहे. त्यांचप्रमाणे व्यक्तीचा विकास करायचा असेल तर प्रथमत: बालकांचा सर्वांग विकास होणे गरजेचे आहे. कारण बाल्यावस्था ही मानवी विकासाच्या अवस्थांमधील अत्यंत महत्त्वाची अवस्था आहे. या वयात बालकाच्या विविध गरजा पूर्ण नाही झाल्या तर बालकांच्या विकासात अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळेच बालवयातच त्यांच्या विविध क्षमता हया विकसित होण्यासाठी बालकेंद्रित शिक्षण देणे गरजेचे असते. बालके ही आपल्या राष्ट्रांची संपत्ती आहे. तो आपल्या देशाच्या विकासाचा महत्वपूर्ण घटक आहे. म्हणून देशाचा विकास करायचा असेल तर बालकांचा विकास होणे गरजेचे आहे.

कोरोना काळामध्ये शाळा बंद असल्यांने बालकांच्या मुलभूत क्षमतेचा परिपूर्ण विकास झाला नाही. अनेक बालकांना अंगणवाडी किंवा बालवाडीचा अनुभव घेता आला नाही. अशा मुलांची व्यवस्थितपणे शाळापूर्व तयारी होण गरजेचे आहे, ज्यामुळे विविध बालकांना लेखन व वाचन शिकताना कोणतीही अडचण येणार नाही. आणि ते इयत्ता पहिलीच्या वर्गात अतिशय सजगतेने समायोजित होतील या अनुषंगाने जून-२०२२ मध्ये इयत्ता पहिलीला दाखल होणाऱ्या बालकांसाठी स्टार्स ( STARS- Strengthening Teaching-Learning and Results for States Program) या प्रकल्पांतर्गत शाळापूर्व तयारी अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. नवीन राष्ट्रीय धोरणामध्ये या स्टार्स प्रकल्पाला समाविष्ट केले आहे. प्रथम एज्युकेशन फांऊडेशन, महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त सहभागाने इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या बालकांसाठी शाळापूर्व तयारी अभियान राबविण्यात येते आहे.

-नवि-न शैजजिज धोरजामध्ये पज बालशिजजाला महत्त्व दिले आहे. यासाठीच त्यांनी अंगणवाडी हया प्राथमिक शाळेला जोडण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. बालशिक्षण हा आजच्या आधुनिक व माहिती तंत्रज्ञानाच्या काळातील व्यक्ती विकासाचा अविभाज्य घटक आहे. बालशिक्षणामुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीचा सर्वांगिण विकास साधता येतो. परिणामत: समाजाचा व राष्ट्रांचा विकास होतो. राष्ट्रांला कुशल मनुष्यबळ मिळते. यासाठीच बालशिक्षणाशिवाय पर्याय नाही, हे वास्तव नाकारता येत नाही. सदरिल शाळा पूर्व तयारी अभियानाची अमंलबजावणी प्रत्यक्ष त्यांना कोण-कोणत्या समस्या येतात याचे परिक्षण करणे गरजेचे आहे. तसेच या शाळा पूर्व तयारी अभियानाचा बालकांच्या शारीरिक, बौध्दिक, सामाजिक, भावनिक, भाषिक व गणन विकासावर सकारात्मक परिणाम झाला आहे का नाही हे समजून घेणे महत्वाचे आहे. यासाठी प्रस्तुत संशोधन संशोधिकेने हाती घेतले आहे.

**२. संशोध-न समस्या विधा-न :-**

जालना जिल्ह्यातील शाळापूर्व तयारी अभियानाचा बालकांच्या विकासावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास.

**३. संशोधन समस्येतील कार्यात्मक व्याख्या -**

१. **जालना -**

महाराष्ट्र राज्यातील एकुण ३६ जिल्ह्यापैकी एक व मराठवाडा विभागात तो उत्तर दिशेस येतो. जिल्ह्याचे अक्षवृत्तीय व रेखावृत्तीय स्थान म्हणजे १९.१ उत्तर ते २१.३ उत्तर अक्षांश व ७५.४ पूर्व ते ७६.४ पूर्व रेखांश आहे.

२. **शाळापूर्व तयारी अभियान-**

इयत्ता पहिलीच्या वर्गात अतिशय सजगतेने समायोजित होण्यासाठी जून-२०२२ मध्ये महाराष्ट्रामध्ये ६ वर्षांच्या बालकांसाठी शाळापूर्व तयारी अभियान सुरु झाले.

**३. बालकांचा विकास-**

शरीरिज, बौध्दिज, मा-सिज, भावा-िक, सामाजिक भाषाविकास व गणन विकास या क्षमताचा परिपूर्ण विकास होणे म्हणजे बालकांचा विकास होय.

४. **परिणामांचा अभ्यास-**

शाळापूर्व तयारी अभियानाचा बालकांच्या सर्व मानसिक ज जावर होजारा प्रभाव म्हणजे परिणाम, वैज्ञानिक पध्दतीने निरीक्षण व विश्लेषण करून त्यांचा सूक्ष्म अध्ययन करणे म्हणजे अभ्यास होय.

**४. संशोधनाची गृहितके-**

१. शाळापूर्व तयारी अभियान सहा वर्षांच्या बालकासाठी आहे.
२. शाळापूर्व तयारी अभियान हे बालकांच्या वाढ व विकासाशी संबंधित आहे.
३. प्राथमिक शाळेतील शिक्षकांना शाळापूर्व तयारी अभियानाची माहिती आहे.

**५. संशोधनाची उद्दिष्टे-**

१. शाळापूर्व तयारी अभियानाचा बालकांच्या शारीरिज विकासावर होणाऱ्या परिणामांचा शोध घेणे.
२. शाळापूर्व तयारी अभियानाचा बालकांच्या बौद्धिक विकासावर होणाऱ्या परिणामांचा शोध घेणे.
३. शाळापूर्व तयारी अभियानाचा बालकांच्या सामाजिक विज ासावर होणाऱ्या परिणामांचा शोध घेणे.
४. शाळापूर्व तयारी अभियानाचा बालकांच्या भावनिक विकासावर होणाऱ्या परिणामांचा शोध घेणे.
५. शाळापूर्व तयारी अभियानाचा बालकांच्या भाषा विकासावर होजाऱ्या परिजामांचा शोध घेणे.

**६. परिज ल्प-ा -**

१. शाळापूर्व तयारी अभियान राबविताना विविध समस्या येतात.
२. शाळापूर्व तयारी अभियानाचा बालकाच्या विकासावर सकारात्मक परिणाम झाला आहे.

**७. संशोधनाची कार्यवाही-**

**१. संशोधन पध्दती-**

प्रस्तुत संशोधन हे सर्वेक्षण संशोधन पध्दतीने करण्यात आले आहे.

**२. न्यादर्श निवड-**

जालना, बदनापूर, मंठा व अंबड या चार तालुक्यातील प्रत्येकी २० शाळेतील ०१ शिक्षकांची म्हणजे एकूण ८० प्राथमिज शिक्षकांची प्रस्तुत संशोधनात असंभाव्यता नमुना निवड पध्दतीतील सहेतुक स्वि-र्जिय -मु-ा निवड पध्दतीने करण्यात आली आहे.

**३. संशोधनाची साधने-**

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने प्राथमिक शिक्षकांकडून माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावली हे साधन वापरयात आले आहे.

**४. माहितीचे विश्लेषण व अर्थनर्वचन-**

८० प्राथमिक शिक्षकांना प्रश्नावली हे साधन देऊन माहिती संकलित करण्यात आली व प्राप्त माहितीचे शेकडेवारी या तंत्राच्या साहाय्याने प्राप्त माहितीचे विश्लेषण व अर्थनर्वचन करयात आले आहे.

**८. संशोधनाचे प्रमूख निष्कर्ष-**

१. ७५% शिक्षकाच्या मते शाळापूर्व तयारी अभियानामुळे बालकांच्या शारीरिक, बौध्दिक, सामाजिक, भावनिक, भाषा व गणन या सर्व क्षमताचा विकास झाला आहे.
२. ६८.४२% शिक्षकांच्या मते शाळापूर्व तयारी अभियानाचा बालकांच्या शारीरिक विकासावर सकारात्मक परिणाम झाला आहे.
३. ६१.२५% शिजकांच्या मते शाळापूर्व तयारी अभियानाचा बालकांच्या बौध्दिक विकासावर सकारात्मक विकास झाला आहे.
४. ५०.००% शिक्षकांच्या मते शाळापूर्व तयारी अभियानाचा बालकांच्या सामाजिक व भावनिक विकासावर सकारात्मज परिजाम झाला आहे.
५. ७१.२५% शिक्षकांच्या मते शाळापूर्व तयारी अभियानामुळे बालकांच्या भाषा विकासावर सकारात्मक परिणाम झाला आहे.
६. ५०.००% शिक्षकांच्या मते शाळापूर्व तयारी अभियानाचा बालकांच्या गणनपूर्व तयारी विकासावर सकारात्मक परिजाम झाला आहे.

**९. शिक्षकांसाठी शिफारशी-**

१. शाळापूर्व तयारी अभियानामध्ये पालकांचा सहभाग घ्यावा.
२. शाळापूर्व तयारी अभियानाच्या माध्यमातून पालक माताला मुलांच्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी यांचे मार्गदर्शन ज रावे.
३. प्राथमिक शिक्षकांनी अंगणवाडी सेविकांना शाळापूर्व तयारी अभियानाचे नियोजनामध्ये सहभागी करुन घ्यावे.
४. शाळापूर्व तयारी अभियानाच्या माध्यमातून बालकां-ना मोबाईलचे आरोग्यावर होणारे परिणाम चित्रफितीच्या माध्यमातून सांगावे.
५. शाळापूर्व तयारी अभियानामध्ये गणनपूर्व विकास क्षमता विकासासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवावेत, ज्यामुळे बालकांच्या गणनपूर्व क्षमता विकास होईल.
६. बालकांच्या शारीरिक विकास क्षमता वाढीसाठी बालकांसाठी आवश्यक योगाचे प्रकार सांगावेत.
७. शाळापूर्व तयारी अभियानामध्ये बौध्दिक विकासासोबतच मूल्य विकासाचा पण विचार करावा.
८. शाळापूर्व तयारी अभियानाच्या माध्यमातून बालकांच्या सामाजिक विकासासाठी गावपातळीनुसार सामाजिक समस्या वर आधारित उपक्रम राबवावेत.
९. बालकांच्या भावनिक विकासासाठी भावनावर नियंत्रण कसे मिळवावे याचे साधे प्रकार मुलांना सांगावेत. उदा. ध्यान, प्राजायम..

**१०. संदर्भग्रंथ सूची-**

१. बडगे अ.तु. (२००७) **प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम २००४.,** पुणे: महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षज परिषद.
२. भावळजज र वा.जो.(२००३) **प्राथमिज शिजज: सद्य:स्थिती समस्या व उपाय.**, पुणे:सुविचार प्रकाशन.
३. काठमोरे, रमाकांत (२०२२) **जीवन शिक्षण.**, पुणे: महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद.
४. काठमोरे, रमाकांत (२०२२) **शाळेतले पहिले पाऊल.,** पुजे: महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद.
५. आगलावे, प्रदीप (२०००) **संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे** (आ.१)_नाजपूर : विद्या प्रज ाश-न.
६. कऱ्हाडे, बी. एम. (२००७) **शास्त्रीय संशोधन पध्दती -नाजपूर** : पिंपळापुरे पब्लिशर्स.
७. भिंताडे, वि. रा. (२००४) **शैक्षणिक संशोधन पध्दती** (आ.३) पुणे : नूतन प्रकाशन.